जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६०४ दिनांक - ०७/०८/२०२३**

**खंडणी विरोधी पथक १,गुन्हे शाखा,पुणे शहर**

## अपहरण करून खंडणी मागणा-या आरोपींच्या खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा व उत्तमनगर पो.स्टे यांनी संयुक्त कारवाई करून आवळल्या मुसक्या

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. सह पोलीस आयुक्त पुणे शहर, मा. अप्पर पोलीस आयुक्त सो, गुन्हे, पुणे शहर यांनी उत्तमनगर पोलीस ठाणे, पुणे शहर गु.र.नं. ८८/२०२३ भा.दं.वि कलम ३४२,३५२,३६५,३२३,५०४,५०६,३४ हा अति संवेदनशील गुन्हा दाखल झाल्यानंतर सदर गुन्हयाचा समांतर तपास करणेबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांनी पुणे शहर व परिसरात गुन्ह्यातील पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली होती.

सदरचा गुन्ह्याचा तपास करत असताना तांत्रिक विश्लेषणाद्वारे गुन्हयातील आरोपी हे तासगाव, सांगली येथे असल्याची माहिती ही खंडणी विरोधी पथक १ कडील पोलीस स्टाफ व उत्तमनगर पो.स्टे कडील तपास पथकातील अधिकारी व स्टाफ यांना समजली होती. त्यानुसार दि. ०६/०८/२०२३ रोजी खंडणी विरोधी पथक १ कडील पोलीस स्टाफ व उत्तमनगर पो.स्टे कडील तपास पथकातील टीम यांनी तासगाव, सांगली येथे जावून मिळालेल्या माहिती नुसार सदर ठिकाणी सापळा रचून शिताफीने आरोपी नामे **१) अक्षय मोहन कदम वय २८ वर्षे रा. मु.पो. गोटी खुर्द ता. खानापूर जि. सांगली २) सुशांत मधुकर नलावडे वय २६ वर्षे रा. मु.पो. तळेवस्ती ता. तासगाव जि. सांगली ३) महेश मलिक नलावडे वय २६ वर्षे रा. मु.पो. तळेवस्ती वायफळे ता. तासगाव जि. सांगली ४)बोक्या ऊर्फ रंजित दिनकर भोसले वय २६ वर्षे रा. भारती शाळेजवळ, ता.तासगाव जि. सांगली ५)प्रदिप किसन चव्हाण वय २६ वर्षे रा. शिंदे मळा, भाळवणी ता. खानापूर जि.सांगली ६)अमोल उत्तम मोरे वय ३२ वर्षे रा.बिरंवडी ता. तासगाव जि.सांगली** यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले असून त्यांचे तावडीतून पिडीताची सुटका केली आहे.तसेच सदर आरोपींच्या ताब्यातून गुन्हयात वापरलेल्या गाड्या ६ मोबाईल हस्तगत करण्यात आलेले आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. रितेश कुमार, मा. सह पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.रामनाथ पोकळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त-१, गुन्हे शाखा श्री.सुनिल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि. अजय वाघमारे, व.पो.नि किरण बालवडकर यांचे सुचनेप्रमाणे स.पो.नि. अभिजीत पाटील, सपोनि रोकडे, पोलीस अंमलदार रविंद्र फुलपगारे, किरण देशमुख, किरण ठवरे, उज्वल मोकाशी, राजेंद्र लांडगे, ज्ञानेश्वर तोडकर यांनी केली आहे.